# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड संयुक्त विद्यमाने

# बी.ए. भाग- 2 मायनर पेपर सेमिस्टर 3 व 4

# शारीरिक शिक्षण सुधारित अभ्यासक्रमाची कार्यशाळा

# दि. 11 ऑगष्ट 2025

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतरविद्याशाखीय अभ्यासशाखेकडून सन 2025-26 मध्ये नवीन शैक्षणिक धोरणानुसार (NEP 2.0) अभ्यासक्रम सुधारित केलेल्या वर्गांच्या सुधारित अभ्यासक्रमांचे महाविद्यालयीन शिक्षकांचे प्रशिक्षण शिबिर तथा कार्यशाळा मंजूर झाल्या त्याअंतर्गत बी. ए. भाग 2 शारीरिक शिक्षण (ऐच्छिक) विषयाच्या सुधारित अभ्यासक्रमाची कार्यशाळा श्री शिवाजी शिक्षण संस्था,विद्यानगर,कराडच्या उच्च शिक्षण मंडळ, विद्यानगर,कराडचे वेणूताई चव्हाण कॉलेज, कराडमधील शारीरिक शिक्षण विभागास मंजूर झाली होती. सोमवार, दिनांक 11 ऑगष्ट 2024 रोजी सदर कार्यशाळेचे आयोजन वेणूताई चव्हाण कॉलेज, कराडमधील शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या कक्षेतील तीनही जिल्ह्यात ज्या ठिकाणी शारीरिक शिक्षणाची मायनर पेपर सेमिस्टर 'योग तत्वज्ञान आणि भारतीय संस्कृती' सेमिस्टर 3 व 4 बी. ए. भाग 2 च्या

वर्गासाठी अध्यापनास आहे, त्या ठिकाणावरील सर्व अध्यापकांना याबाबत पत्राद्वारे निमंत्रित करून येण्यास सूचित केले गेले. तसेच सदर सुधारित अभ्यासक्रमातील सेमिस्टर 3 व सेमिस्टर 4 मधील मायनर पेपर क्रमांक 1 व पेपर क्रमांक 2 ज्यामध्ये ५०% लेखी परीक्षेचा अभ्यासक्रम आहे व ५०% प्रात्यक्षिक परीक्षेचा अभ्यासक्रम समाविष्ट आहे, त्यासाठी एकूण ०४ साधनव्यक्तींना निमंत्रित करण्यात आले, तसेच बीजभाषणासाठी सदर विषयातील सर्वात ज्येष्ठ व अनुभवी प्राध्यापक डॉक्टर बाबासाहेब उलपे यांना निमंत्रित करण्यात आले.

उद्घाटन समारंभ शा. शिक्षण, भूगोलशास्त्र व मनजमेंट (कॉमर्स) विभाग असा संयुक्तिक पार पडला. श्री शिवाजी शिक्षण संस्था, विद्यानगर,कराडच्या उच्च शिक्षण मंडळ, विद्यानगर, कराडचे जनरल सेक्रेटरी मा. अल्ताफहुसेन मुल्लासाहेब व विश्वस्त मा. अरुणकाका पाटील उद्घाटक व अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. कार्यशाळेचे निमंत्रक, अभ्यासमंडळांचे अध्यक्ष, सदस्य व सदर विषयाचे अध्यापन करणारे विविध महाविद्यालयातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उदघाटन समारंभास सदर विषयाच्या काही विद्यार्थ्यांनी हजेरी लावली.

डॉ. बी .एन.उलपे यांच्या बीजभाषणाने कार्यशाळेची सुरुवात झाली. अभ्यासक्रमाची रचना सुधारित करण्याचे नियम तथा पद्धती तसेच याची गरज व

महत्त्व याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. बी. ए. भाग २ या सुधारित अभ्यासक्रम नवीन शैक्षणिक धोरणानुसार असून विद्यार्थ्यांच्या कुवतीचा व त्यांच्या भविष्याचा विचार करून तयार केला असल्याचे सांगून त्यांनी अभ्यासक्रम सुधारित करणाऱ्या उपसमितीची विशेष प्रशंसा केली. उपस्थित सर्वांनी सदर अभ्यासक्रम समजून घ्यावा चर्चा करावी व डॉ. महेंद्र कदमपाटील लिखित व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर प्रकाशित 'योग तत्वज्ञान आणि भारतीय संस्कृती' हे पाठ्यपुस्तक अवलोकन करावे असे सूचित केले.

सेमिस्टर 3 मायनर पेपर योग तत्वज्ञान आणि भारतीय संस्कृती लेखी परीक्षेचा अभ्यासक्रम यावर डॉ.एस. ए. हिरुगडे-पवार, कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली यांनी साधनव्यक्ती म्हणून अभ्यासपूर्ण भाष्य केले. एकूण चार मोड्यूलपैकी 1 व 2 मोड्यूल व त्यातील उपमुद्द्यावर त्यांनी उपस्थितांना जुन्या व सुधारित बदलाबाबत अवगत केले. पावर पॉइंट सादरीकरणाच्या माध्यमातून त्यांनी आपली मते उपस्थिततांच्या समोर सादर केली.

उर्वरित दोन मोड्यूलवर व प्रात्यक्षिक परीक्षा अभ्यासक्रमावर डॉ संजय पाटील, कृष्णा महाविद्यालय रेठरे बु।(शिवनगर) योनी साधनव्यक्ती म्हणून तज्ञ मार्गदर्शन केले, काही बदलही सुचविले.

तृतीय सत्र डॉ. संदीप पाटील, कर्मवीर भाऊराव पाटीत कॉलेज, इस्लापूर यांनी सेमिस्टर 4 मधील पेपर नं. 2 मधील लेखी परीक्षेचा पेपर योग तत्वज्ञान आणि भारतीय संस्कृती याबाबत अभ्यासपूर्ण भाष्य केले, पावर पॉइंट सादरीकरणाच्या माध्यमातून त्यांनी आपली मते उपस्थितताांच्या समोर सादर केली.

दुपारच्या जेवणानंतर चौथ्या सत्रात डॉ. रुपाली कांबळे, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली यांनी सेमिस्टर 4 मधील पेपर नं. 2 मधील प्रात्यक्षिक परीक्षा अभ्यासक्रम व मानके याबाबत मार्गदर्शन केले.

शेवटच्या सत्रात खुली चर्चा व शंका निरसन करण्यात आले, उपस्थित शिक्षकांनी अनेक शंका व प्रश्न विचारले त्याचे निरसन करण्यात आले. संबंधित अभ्यासक्रमातील काही भाग नवीन असल्याने त्याबाबत लेखी नोट्सही पुरविण्यात आल्या.

सायंकाळी पाच वाजता कार्यशाळेचा समारोप करण्यात आला. सहभागी शिक्षकांना उपस्थिती प्रमाणपत्र, कार्यशाळा प्रमाणपत्र, सकाळचा चहा नास्ता, दुपारचे जेवण व सायंकाळचा चहा पुरविण्यात आला.

प्रा. व्ही. एस. डाफळे यांनी आभार मानून कार्यशाळेची सांगता करण्यात आली.

एकूण २१ प्राध्यापक हजर राहिले, उपस्थितांनी प्रत्याभरण फॉर्म लिहून दिले.

सदर कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी मा. प्राचार्य, जिमखाना उपाध्यक्ष, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विभागाचे विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

या कार्यशाळेसाठी निमंत्रक म्हणून वेणुताई चव्हाण कॉलेज, कराडच्या शारीरिक शिक्षण विभागाचे प्रमुख व शिवाजी विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. महेंद्र कदमपाटील यांनी काम पाहिले.